म.टा.पू.पान क्र. १

दि. 18/03/2023

# आयुक्तालयाला हक्काची जागा

## पोलिस मुख्यालय, परेड ग्राउंडही लवकरच

म. टा. वृत्तसेवा, वसई

- पोलिस महासंचालक रजनीश सेठ यांचा विश्वास
- नायगाव येथील नवीन पोलिस ठाण्याच्या उद्घाटन सोहळ्यात प्रतिपादन

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयासाठी मिरा रोड येथे जागा मंजूर झाली असून तिच्या हस्तांतरणाची प्रक्रियाही पूर्ण झाली आहे. दुसरीकडे वसई येथे पोलिस मुख्यालय, पोलिस वसाहत आणि परेड ग्राउंड यासाठी २७.१८ एकर सरकारी जागा पोलिस आयुक्तालयाच्या नावावर झाली असून ती हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे पोलिस आयुक्तालयाला लवकरच नवे आयुक्तालय आणि मुख्यालय मिळणार असल्याचा विश्वास पोलिस महासंचालक रजनीश सेठ यांनी शुक्रवारी व्यक्त केला.

वसईजवळील नायगाव पूर्व येथे नव्याने सुरू केलेल्या नायगाव पोलिस ठाण्याचे शुक्रवारी पोलिस महासंचालक रजनीश सेठ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाचे पोलिस आयुक्त मधुकर पाण्डेय, अप्पर पोलिस आयुक्त श्रीकांत पाठक, पोलिस उपायुक्त सुहास बावचे, खासदार राजेंद्र गावित आदी मान्यवरांसह इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. यावेळी बोलताना पोलिस महासंचालक पुढे म्हणाले की, 'नागरिकांच्या तक्रारींची योग्य दखल घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून नायगाव परिसरातील नागरिकांच्या तक्रारींचे निवारण जवळच व्हावे, यासाठी नायगाव पोलिस ठाण्याची निर्मिती करण्यात आली आहे. प्रत्येक नागरिकाच्या तक्रारीची दखल घेऊन ती योग्य प्रकारे, पक्षपात न करता हाताळण्याचे काम पोलिस ठाण्याच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.'

रोहित राऊत



गेल्या दोन वर्षांपासून नायगाव पोलिस ठाण्याचे काम प्रस्तावित असल्याने ते लवकरात लवकर सुरू व्हावे, अशी मागणी नागरिकांमधून होत होती. अखेर शुक्रवारी या पोलिस ठाण्याचे उद्घाटन करून ते खुले करण्यात आले आहे. नायगाव पोलिस ठाण्यात दोन पोलिस निरीक्षकांसह एकूण १४ पोलिस अधिकारी व ४३ कर्मचारी असा पोलिसांचा ताफा कार्यरत असणार आहे. या पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश भामे असणार आहेत. या नवीन पोलिस ठाण्याला कॉर्पोरेट लूक देण्यात आला आहे. त्यामुळे उद्घाटनाआधीच हे पोलिस ठाणे चर्चेत आले होते.

### प्रस्तावित पोलिस आयुक्तालयाची सद्यस्थिती

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयासाठीच्या प्रस्तावाला २९ ऑगस्ट २०१९ रोजी मंत्रिमंडळाने मान्यता दिली होती, प्रत्यक्ष कामकाजाला १ सप्टेंबर २०२०पासून सुरुवात झाली. आयुक्तालयासाठी मिरा-भाईंदर महापालिकेने तात्पुरत्या स्वरूपात जागा दिली आहे. परंतु कायमस्वरूपी जागेची विनंती मिरा-भाईंदर पालिकेकडे करण्यात आली होती. त्यावर पालिकेने विकास आराखड्यातील आयुक्तालयासाठी मंजूर असलेली मिरा रोड येथील ७,३४६ चौमी जागा हस्तांतरित करण्यासाठी १० कोटी रुपयांची मागणी केली होती. हा निधी सरकारने पालिकेला वर्ग केल्यानंतर, ही जागा हस्तांतरित झाली आहे.

### वसईत मुख्यालय, परेड ग्राउंड

सिडको विकास आराखड्यात दिवाणमान येथील जागेत महापालिकेच्या वापरासाठी विविध सहा आरक्षणे आहेत. त्यापैकी पोलिस आयुक्तालय आणि परेड ग्राउंडसाठी एक लाख १०हजार २४ चौमी जागा आरक्षित आहे. या आराखड्यास २००७ मध्ये राज्य सरकारने मंजुरी दिली होती. त्यामुळे ती जागा पोलिस खात्याच्या नावावर आहे. मात्र ही जागा अद्याप पोलीस खात्याकडे हस्तांतरित झाली नसून त्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे. ही जागा हस्तांतरित झाल्यास वसईमध्ये पोलिसांसाठी परेड मैदान उपलब्ध होणार आहे. पोलिस मुख्यालयासह पोलिस वसाहतही या ठिकाणी उभारण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. वसईत तालुक्यात केवळ एकच पोलिस वसाहत वसई गाव येथे आहे. ती अपुरी असल्याने लवकर जागा हस्तांतरणाची गरज व्यक्त होत आहे.

CamScanner

Scanned with CamScanner

लोकसत्ता पान क्र. 18 दि. 18/03/2023

हेल्पलाइन क्रमांक ११२ वर तक्रार करताच चार मिनिटांत मदतीसाठी पोलीस हजर

# नागरिकांच्या अडचणींना पोलिसांचा जलदगतीने प्रतिसाद

लोकसत्ता वार्ताहर

**वसई:** मीरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या ११२ या हेल्पलाइन सेवेचा नागरिकांना अडचणींच्या काळात जलदगतीने प्रतिसाद मिळू लागला आहे. या हेल्पलाइन सेवेवर आतापर्यंत ३५ हजारांहून अधिक दूरध्वनी आले असून सेवेसाठी सरासरी ४ मिनिटांत पोलीस हजर झाले आहेत. अगदी कमी वेळेत सेवा दिल्यामुळे मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय राज्यात प्रथम क्रमांकावर आले आहे.

मीरा भाईंदर व वसई विरार शहर झपाट्याने विकसित होऊ लागले



आहे. या भागातील नागरिकांना संकटकाळात तातडीने पोलिसांची मदत व्हावी यासाठी ११२ ही हेल्पलाइन सेवा सुरू केली आहे.

ही सेवा पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात अगदी प्रभावीपणे राबविली जात आहे. या सेवेचा अडचणीत सापडलेल्या नागरिकांना अधिकच फायदा झाला आहे. ११२ क्रमांकावर दूरध्वनी केल्यास पोलिसांच्या नियंत्रण कक्षातून नागरिकांना जलदगतीने प्रतिसाद मिळू लागला आहे.

मागील वर्षी २०२२ या वर्षात आयुक्तालयाच्या अंतर्गत ३४ हजार ९८७ दूरध्वनी आले होते. तेव्हा नागरिकांना मदतीसाठी हजर होण्याचा कालावधी ७ मिनिटे ३४ सेकंद इतका होता, तर चालू वर्ष २०२३ मध्ये आतापर्यंत ७ हजार ३७३ दूरध्वनी आले असून फेब्रुवारी महिन्यात मदतीसाठी हजर होण्याचा कालावधी हा ४ मिनिटे ९ सेकंद असा राहिला आहे.

त्यामुळे अडचणीत असलेल्यांना मदत, अडकलेल्यांची सुटका तसेच आत्महत्या करणाऱ्यांना रोखणे यामुळे शक्य झाले आहे. राज्यात ११२ क्रमांकाची हेल्पलाइन सेवा सुरू करण्याचा पायलट प्रोजेक्ट मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयामार्फत सुरू केला होता तो यशस्वीरीत्या सुरू असून हेल्पलाइन ११२ ही प्रणाली अधिक प्रभावीपणे राबविण्याबद्दल मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस दलाला राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे.

### ११२ नियंत्रित करणाऱ्या अधिकाऱ्याचा सत्कार

मीरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयांच्या अंतर्गत ११२ हेल्पलाइन सेवा अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण करण्याचे पोलीस उपनिरीक्षक राणा परदेशी हे करीत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नायगाव पोलीस ठाण्याच्या उद्घाटन सोहळ्याच्या कार्यक्रमात राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांच्या हस्ते राणा परदेशी यांचा सत्कार करण्यात आला.

# वसई, विरारच्या सागरी किनारपट्टीची सुरक्षितता धोक्यात

पाच पैकी तीन गस्तिनौका बंद, मासेमाऱ्यांच्या बोटींचा आधार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई:** वसई, विरार आणि भाईंदरच्या सागरी किनारपट्टीची सुरक्षितता धोक्यात आली आहे. समुद्रात गस्त घालण्यासाठी घेण्यात आलेल्या ५ अत्याधुनिक बोटींपैकी केवळ २ बोटी कार्यरत असून ३ बोटी बंद पडल्या आहेत. या बोटी दुरुस्तीच्या पलीकडे गेल्या आहेत. यामुळे गस्ती कमी झाल्या आहेत. दुसरीकडे पोलिसांनी मासेमाऱ्यांच्या बोटी भाड्याने घेतल्या असून त्याच्या भाड्यापोटी ६० लाखांचा भुर्दंड पडला आहे. अपुरे मनुष्यबळ असल्याने समुद्र किनाऱ्यावरील बीट चौक्यांमध्ये शुकशुकाट असतो तसेच तपासणी नाकेही ओस पडलेले आहेत.

मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्त कार्यालयाला ३० किलोमीटर लांबीचा सागरी किनारा आणि ४२ किलोमीटर लांबीचा खाडी किनारा लाभला आहे. या किनारपट्टीवर १७ जेट्टी असून ४३ लॅण्डिंग पॉइंट्स आहेत. त्यामुळे



वसई विरार आणि भाईंदरचा समुद्रकिनारा हा खूप संवेदनशील मानला जातो.

मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ला सागरी मार्गाने आलेल्या दहशतवाद्यांकडून झालेला होता. तेव्हापासून सागरी किनाऱ्यांची सुरक्षा कडक करण्यात आली होती. सागरी किनारी अभेद्य सुरक्षा कवच उभारण्याचे निर्देश केंद्रीय गृहमंत्रालयाने दिले होते. पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाल्यानंतर सागरी सुरक्षेवर भर देण्यात आला होता. समुद्रात गस्ती घालण्यासाठी एकूण ५ बोटी घेण्यात आल्या होत्या. मात्र या ५ बोटींपैकी केवळ २ बोट सुरू आहेत. दोन बोटी बंद पडल्या असून १ बोट नादुरुस्त झाली आहे.

बंद पडलेल्या बोटींची दुरुस्ती करणे शक्य नसल्याने पोलिसांनी ३ मासेमारी बोटी भाड्याने घेतल्या होत्या.

१०० दिवसांसाठी या बोट भाडण्याने घेण्यात आल्या होत्या आणि त्यासाठी ६० लांख रुपयांचे भाडे अदा करण्यात आले आहे. सध्या आमच्याकडे २ शासकीय आणि ३ मासेमाऱ्यांच्या बोटी असून त्याद्वारे समुद्रात नियमित गस्त घातली जाते. वसई आणि भाईंदरचा समुद्रकिनारा सुरक्षित आहे, असा दावा पोलीस अधिकाऱ्यांनी केला आहे.

### बीट चौक्यांमध्ये शुकशुकाट

वसई, विरार सागरी किनाऱ्यालगत असलेल्या गास, सत्पाळा आणि कळंब या तीनही पोलीस चौक्यांमध्ये शुकशुकाट असल्याचे नागरिकांनी सांगितले. या चौक्यांमध्ये पोलीस नसल्याने समुद्रकिनारी येणारे पर्यटक आणि मद्यपींचा त्रास होत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. सध्या पोलीस बळ अपुरे असल्याने चौक्या आणि तपासणी नाके नियमित सुरू ठेवता येत नाही. पुरेसे बळ मनुष्यबळ आल्यानंतर तपासणी नाके सुरू करून चौक्या वाढविण्यात येतील अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

CamScanner

Scanned with CamScanner

लोकसत्ता पान क्र. 19 दि. 18/03/2023

# नागरिकांच्या तक्रारींची तत्काळ दखल घ्या

## पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांचे आदेश

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** पोलिसांची बांधिलकी ही सर्वसामान्य नागरिकांशी असायला हवी. पोलीस ठाण्यात आलेल्या नागरिकांच्या तक्रारींचे वर्गीकरण करण्यात वेळ न दडवता तत्काळ गुन्हे दाखल करावेत, असे आदेश राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी दिले.

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाल्यानंतर नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्यात येत आहे. वालीव पोलीस ठाण्याचे विभाजन करून नायगाव हे नवीन पोलीस ठाणे तयार करण्यात आले आहे. त्याचे उद्घटन शुक्रवारी सकाळी सेठ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

या वेळी खासदार राजेंद्र गावित, पोलीस आयुक्त मधुकर पांडे, अतिरिक्त पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक आदी उपस्थित होते.

नागरिकांच्या मनात पोलिसांबद्दल विश्वास वाटायला हवा. त्यासाठी नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून काम करायला हवे. पोलीस ठाण्यात आलेल्या तक्रारी कुठल्या प्रकारच्या आहेत, त्याचे वर्गीकरण करण्यात वेळ वाया न घालवता तत्काळ गुन्हे दाखल करून नागरिकांना न्याय द्यावा, असे आदेश त्यांनी पोलिसांना दिले. तर, या पोलीस ठाण्यामुळे गुन्हेगारीला आळा बसण्यास मदत होईल, असा विश्वास खासदार गावित यांनी व्यक्त केला.



### 'उर्वरित तीन पोलीस ठाणी लवकरच'

पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाल्यानंतर शहरात सात नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती केली जाणार होती. त्यामध्ये वसई-विरार शहरातील आचोळे, पेल्हार, मांडवी, बोळिंज, नायगाव या पाच पोलीस ठाण्यांची, तर मीरा-भाईंदर शहरात काशिगाव आणि खारीगाव या दोन पोलीस ठाण्यांचा समावेश होता. त्यापैकी आचोळे, पेल्हार, मांडवी आणि नायगाव ही चार पोलीस ठाणी तयार झाली आहेत. तर, उर्वरित बोळिंज, काशिगाव आणि खारीगाव ही तीन पोलीस ठाणी लवकरात लवकर सुरू करणार आहोत, असे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी सांगितले.

**नायगाव पोलीस ठाण्यात १३ अधिकारी**

नायगाव पूर्वेच्या तिवरी रोड येथील वामन ढाब्याजवळील खासगी इमारतीमधील आठ गाळे भाड्याने घेऊन हे पोलीस ठाणे सुरू करण्यात आले आहे. या पोलीस ठाण्याची रचना कॉर्पोरेट कार्यालयाच्या धर्तीवर करण्यात आली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे यांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भामे यांच्या सोबत दोन पोलीस निरीक्षक, पाच साहाय्यक पोलीस निरीक्षक, असे मिळून १३ पोलीस अधिकारी आणि ४३ पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय महाराष्ट्र सुरक्षा बलाचे २७ कर्मचारी या पोलीस ठाण्यात तैनात करण्यात आले आहेत. हे पोलीस ठाणे भाड्याच्या इमारतीत असल्याने या पोलीस ठाण्यात पोलीस कोठडी नाही. दरम्यान, उद्घाटन सोहळा संपताच एक दाम्पत्य तक्रार दाखल करण्यासाठी आले होते.

# शासकीय रुग्णालयाबाहेर रुग्णवाहिकेत धिंगाणा

## गाणी, नृत्यामुळे रुग्ण त्रस्त

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** भाईंदरच्या शासकीय रुग्णालयाबाहेर मध्यरात्री खासगी रुग्णवाहिकाचालक मोठ्याने गाणी वाजवून धिंगाणा घालत असल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे रुग्णालयातील रुग्णांना त्रास होत असून अशा बेशिस्त चालकांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

> "रुग्णवाहिकेचा वापर केवळ रुग्णांना सेवा देण्यासाठी केला पाहिजे. अशा प्रकारे रुग्णालयाबाहेर रस्त्यावर रुग्णवाहिकेत गाणी वाजवणाऱ्या बेशिस्त चालकांवर कारवाई व्हावी, अशी मागणी आम्ही पोलिसांकडे करत आहोत.
> - **अर्पण वडके**, अध्यक्ष, मीरा भाईंदर रुग्णवाहिका संघटना

भाईंदर पश्चिम येथे २०० रुग्णशय्येचे पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालय आहे. या रुग्णालयात रुग्णांसाठी शासनाने शासकीय तसेच खासगी रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. मात्र, येथील अनेक खासगी रुग्णवाहिकाधारक याचा गैरफायदा घेत असल्याचे समोर आले आहे. हे चालक मध्यरात्री रुग्णालयाबाहेरच रुग्णवाहिकेत मोठ्यामोठ्याने गाणी वाजवून नृत्य करतात. यामुळे उपचार घेत असलेल्या रुग्णांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. गुरुवारी रात्री रुग्णवाहिकाचालक असाच धिंगाणा घालत असताना एका रुग्णाने हा प्रकार आपल्या मोबाइलमध्ये टिपून तो समाजमाध्यमांवर प्रसारित केला.

अशा बेशिस्त रुग्णवाहिकाचालकांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी रुग्णांकडून केली जात आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

लोकसत्ता पान क्र.18

दि.18/03/2023

# धीरेंद्र शास्त्रींच्या कार्यक्रमासाठी पोलीस बंदोबस्त

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** वादग्रस्त धीरेंद्र शास्त्री यांच्या मीरा रोड येथे होणाऱ्या कार्यक्रमाला काँग्रेस पक्षाने आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीने विरोध केल्यामुळे पोलिसांकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

वागेश्वरधाम सरकार म्हणून प्रसिद्ध असलेले धीरेंद्र शास्त्री यांचा शनिवार आणि रविवारी मीरा रोडच्या एस.के.स्टोन येथील मैदानात कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन आमदार गीता जैन यांच्याकडून करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला काँग्रेस नेते नाना पटोले यांनी विरोध केल्यानंतर आता अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष मधुकर कांबळे यांनी पोलिसांना पत्र देऊन कार्यक्रम रद्द करण्याची मागणी केली आहे. कार्यक्रमामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उभा राहू नये म्हणून मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाकडून शंभरहून अधिक पोलीस कर्मचारी तैनात केले जाणार आहेत. वाहतूक व्यवस्था सुरळीत चालवी म्हणून विशेष योजना आखली जाणार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

# अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार

**वसई:** मुंबईतील जोगेश्वरीतील एका शाळेत शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थीवर शाळेत शिकवणाऱ्या शिक्षकाने बलात्कार केल्याचे घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यामध्ये शिक्षकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलगी सोळा वर्षांची आहे. शिक्षक संजय मुरलीधर घुगे हा सातत्याने या मुलीला मेसेजेस पाठवून प्रेमभावना व्यक्त करत होता. नालासोपारा येथील राहत्या तिच्या अज्ञानाचा फायदा घेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

पुण्यनगरी पान क्र. 2

# सरन्यायाधीशांना ट्रोल करणाऱ्यांवर कारवाई करा! - नाना पटोले



**मुंबई :** राज्यातील सत्तासंघर्षावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना सरन्यायाधीशांनी जी निरीक्षणे नोंदवली, ताशेरे ओढले यातून निर्णय आपल्याविरोधात जातो की काय, या भीतीने सरन्यायाधीशांनाच काही लोकांनी ट्रोल केले, हे लांच्छनास्पद आहे. ट्रोल करण्याची भाडोत्री व्यवस्था कोणाकडे आहे, हे सर्वांना माहीत असून सरन्यायाधीशांना ट्रोल करण्याची हिंमत करणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाची सुनावणी नुकतीच पूर्ण झाली. यादरम्यान सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी काही निरीक्षणे नोंदवली. त्यातून त्यांना समाजमाध्यमात ट्रोल केले जात आहे. यासंदर्भात बोलताना पटोले म्हणाले, राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार पाडताना सुरतेपासून गुवाहाटीपर्यंत काय-काय झाले, राज्यपालांनी पदाचा कसा दुरुपयोग केला, या सर्व घटना आपण सर्वांनी पाहिलेल्या आहेत. सुनावणीदरम्यान न्यायाधीशांनी जे काही प्रश्न विचारले, निरीक्षणे नोंदवली यावर त्यांना ट्रोल केले गेले, हा ट्रोल करण्याचा प्रकार गंभीर आहे. केंद्रातील सरकारवर कोणाचा विश्वासच राहिलेला नाही म्हणूनच राष्ट्रपतींकडे काँग्रेस खासदार दाद मागत आहेत.

**संतांचा अपमान करणाऱ्यांना महाराष्ट्रात पाय ठेवू देणार नाही**

धीरेंद्र शास्त्री या बाबाचा मीरा रोड येथे कार्यक्रम होत आहे, त्यांनी काय प्रवचन करावे हा त्यांचा अधिकार आहे. परंतु या व्यक्तीने जगतगुरू संत तुकाराम महाराज यांच्याबद्दल अपमान करणारे विधान करूनही शिंदे सरकार त्यावर कारवाई का करत नाही? असा सवाल करून पटोले यांनी संतांचा अपमान करणाऱ्यांना आम्ही महाराष्ट्रात पाय ठेवू देणार नाही, असा इशारा दिला आहे.

पुण्यनगरी पान क्र.3

# राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांत सीसीटीव्ही यंत्रणा - उपमुख्यमंत्री

**मुंबई :** राज्यातील १०८९ पोलीस ठाण्यांपैकी १०८२ पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. या ठिकाणी नियमितपणे कॅमेरे सुरू असणे आणि रेकॉर्डिंग जतन केले जाणे या बाबींचे ऑडिट केले जाईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



राज्यातील पोलीस ठाण्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याबाबत राष्ट्रवादीचे आमदार बाबाजानी अब्दुल्लाखान दुर्राणी यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अनिकेत तटकरे यांनी सहभाग घेतला. त्याला उत्तर देताना फडणवीस म्हणाले, राज्यातील १०८९ पैकी १०८२ मध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात आली आहे. उर्वरित सात पोलीस ठाण्यांमध्ये नूतनीकरण आणि स्थलांतरामुळे सीसीटीव्ही बसवण्याचे काम प्रलंबित आहे. सध्या बसवलेल्या कॅमेऱ्यांमध्ये ऑडिओ रेकॉर्डिंगची सुविधा नाही. रेकॉर्डिंग जतन करण्याबाबत ऑडिट केले जाईल. सीसीटीव्ही बसवण्याच्या कामांत विलंब झाल्यामुळे संबंधित सेवा पुरवठादारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येत असल्याची माहितीही गृहमंत्र्यांनी दिली.

CamScanner

Scanned with CamScanner

दि. 18/03/2023

लोकमत पान क्र. 1

# कर्मचाऱ्यांच्या पश्चात वारसांना नवीन पेन्शन योजनेचा लाभ

## मंत्रिमंडळाचा निर्णय : संपावर तोडगा काढण्यासाठी सरकारचे पाऊल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** वर्ष २००५ नंतर राज्य शासकीय सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांना नवीन पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय शुक्रवारी राज्य मंत्रिमंडळाने घेतला. २०१८ सालापासून केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना ही सवलत लागू आहे. तीच सवलत राज्यात लागू करण्यात येत आहे. तथापि, जुन्या पेन्शनच्या मागणीवर मात्र मौन बाळगण्यात आले आहे.

जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी संपावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मनधरणीचा हा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे. राज्यात सध्या सरकारी कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदान दिले जाते. मात्र केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या मृत्यूनंतर सानुग्रह अनुदान किंवा पेन्शन यापैकी ज्याची निवड केली जाईल ते दिले जाते.



### असा मिळेल लाभ

कर्मचाऱ्याने सेवेत रुजू होताना मृत्यूनंतर कुटुंबीयांना पेन्शन हवी की सानुग्रह अनुदान याची निवड करायची आहे. त्याप्रमाणे मृत्यूनंतर कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांना लाभ दिला जाईल.

### नागरिकांना त्रास नको : हायकोर्ट

- सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे निर्माण झालेला धोका रोखण्यासाठी व सामान्यांच्या हितासाठी काय पावले उचलली आहेत, ते सांगण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला शुक्रवारी दिले.
- संपामुळे निर्माण झालेला धोका टाळण्यासाठी राज्य सरकारने काय पावले उचलली आहेत, असा प्रश्न सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने सरकारला केला. त्यावेळी राज्य सरकारतर्फे महाअधिवक्ता बीरेंद्र सराफ यांनी सरकारी कर्मचाऱ्यांचा संप बेकायदेशीर असल्याचे म्हटले.
- सर्वसामान्य नागरिक अत्यावश्यक सेवांपासून वंचित राहू नयेत, विद्यार्थी प्रमाणपत्र आणि मध्यान्ह भोजन योजनेच्या लाभांपासून वंचित राहू नयेत, अशी चिंता व्यक्त करत सामान्यांना अत्यावश्यक सेवांबाबत अडचण येणार नाही, याची खात्री करण्यासाठी तुम्ही कोणती पावले उचलणार? असा प्रश्न न्यायालयाने केला व पुढील सुनावणी २३ मार्च रोजी ठेवली.
- सरकारी कर्मचाऱ्यांना संप तत्काळ मागे घेण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करणारी जनहित याचिका ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी उच्च न्यायालयात दाखल केली आहे. त्यावरील सुनावणी प्रभारी मुख्य न्या. संजय गंगापूरवाला व न्या. संदीप मारणे यांच्या खंडपीठापुढे झाली.

सकाळ पान क्र.5

# संपकऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

## कोकण विभागीय कार्यालयाची ३,८५९ कर्मचाऱ्यांवर कारवाई

नवी मुंबई, ता. १७ (वार्ताहर) : जुनी पेन्शन योजना लागू व्हावी, या मागणीसाठी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, तसेच सरकारच्या विविध विभागांतील विविध संघटनांनी बेमुदत संप पुकारलेला आहे. या संप कालावधीतील वेतनकपातीचा इशारा परिपत्रकाद्वारे संपकरी कर्मचाऱ्यांना देण्यात आला आहे. तसेच त्यांच्याविरोधात शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येऊ नये, अशा प्रकारची कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. कोकण भवनसह सात जिल्ह्यांतील एकूण ३,८५९ महसुली कर्मचाऱ्यांना कोकण विभागीय सामान्य प्रशासन विभागाकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली.



### नोटीस बजावलेले कर्मचारी

| | |
|---|---|
| कोकण विभागीय आयुक्त कार्यालय | ६९ |
| मुंबई शहर | २२६ |
| मुंबई उपनगर | ४७४ |
| ठाणे | ६७१ |
| पालघर | ३९७ |
| रायगड | ८५८ |
| रत्नागिरी | ६८६ |
| सिंधुदुर्ग | ४७८ |



राज्यातील विविध शासकीय, निमशासकीय कर्मचारी संघटना, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी संघटनानी जुनी पेन्शन योजना लागू करावी, यासह इतर मागण्यांसाठी सुरू केलेल्या संपात राज्यातील जवळपास १७ लाखाहून अधिक कर्मचारी सहभागी झाले आहेत. या संपावर तोडगा न निघाल्याने पाचव्या दिवशीदेखील हा संप सुरूच ठेवला आहे. त्यामुळे विविध शासकीय कार्यालयांत कामानिमित्त येणाऱ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. त्यामुळे राज्य सरकारने बेमुदत संप पुकारणाऱ्या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदींनुसार कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

कोकण विभागीय आयुक्त कार्यालयासह त्यांच्या अधिपत्याखालील सात जिल्ह्यांत ४,२४० महसुली कर्मचारी आहेत. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर निवृत्तिवेतन देय असताना त्यांनी बेमुदत संप पुकारल्याने ही कृती अशोभनीय असल्याचे राज्य सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे संपामध्ये सहभागी झाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या सेवेमध्ये खंड पडू शकतो, असा इशारा राज्य सरकारकडून कर्मचाऱ्यांना देण्यात आला.

CamScanner

Scanned with CamScanner

दि. १८/०३/२०२३

पुण्यनगरी पृ. पान क्र.१

# मीरा रोड येथील दिव्यदर्शन कार्यक्रमाला काँग्रेस, अंनिसचा विरोध

। मीरा रोड : मीरा रोड येथे १८ व १९ मार्च रोजी धिरेंद्र कृष्ण शास्त्री ऊर्फ बागेश्वर धाम सरकार जिल्हा छतरपूर (मध्य प्रदेश) यांचा दिव्यदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले, तसेच अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) ने विरोध केला असून या कार्यक्रमावर बंदी घालण्याची मागणी केली आहे.

मीरा रोड येथील एस. के. स्टोन मैदानावर मीरा-भाईंदर भाजपकडून धिरेंद्र शास्त्री यांचा १८ व १९ मार्च रोजी दिव्यदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे आयोजक म्हणून मीरा-भाईंदर शहराच्या आमदार गीता जैन, भाजप जिल्हाध्यक्ष रवी व्यास, माजी जिल्हाप्रमुख हेमंत म्हात्रे, राजन नायर, माजी नगरसेवक सुरेश खंडेलवाल, प्रमोद पांडेय, श्याम गोस्वामी यांनी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे नागरिकांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. त्यांनी शहरात मोठमोठे बॅनर लावले आहेत. बाबा शास्त्री हे महादिव्य दरबार दिव्य दर्शन भरवत आहेत. दिव्य शक्तीचे दावे केले आहेत. चमत्काराचा दावे, दिव्य दरबारात भूत पळवून लावल्याचे, करणी केल्याचे दावे केले आहेत. त्याशिवाय त्यांच्या यूट्यूबवरील व्हिडीओमध्ये अनेक रोगांचे निदान, मंत्राने रोग बरे केल्याचे दावे केले जात आहेत. जादूटोणाविरोधी कायदा २०१३ या कायद्यानुसार एखादी व्यक्ती बंदी घातलेली कृती करत असेल तर त्या कृतीला प्रतिबंधित करणे व त्यावर स्वतः तक्रार दाखल करून कायदेशीर कारवाई करणे तसेच कायद्यानुसार दक्षता अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक यांच्यावर जबाबदारी सोपवली आहे. दक्षता अधिकाऱ्यास या कायद्यानुसार कारवाई करणे बंधनकारक आहे. या कायद्यानुसार अप्रत्यक्ष सहाय्य करणे हा गुन्हा आहे. हा कायदा दखलपात्र व अजामीनपात्र आहे. म्हणून आपण स्वतःही कारवाई करण्याची मागणी अंनिसने केली आहे. तसेच काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे पत्र देऊन या कार्यक्रमावर बंदी घालण्याची मागणी केली आहे. त्यांच्यापाठोपाठ आता अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) ने जादूटोणा विरोधी कायदा व ड्रग्स अँड मॅजिक रेमिडीज-अ‍ॅक्टनुसार गुन्हा दाखल करून कार्यक्रमावर बंदी घालावी, अशी मागणी केली आहे. यावेळी अंनिसचे राष्ट्रीय अध्यक्ष मधुकर कांबळे, राज्य संघटक हरिभाऊ पाथोडे, राष्ट्रीय उपाध्यक्ष रवींद्र खानविलकर, चंद्रकांत सर्वगोड, डॉ. प्रकाश ढोकने, प्रकाश सावंत यांनी लेखी पत्राद्वारे मीरा रोड पोलीस निरीक्षक यांच्याकडे मागणी केली आहे.

# नालासोपाऱ्यात १० लाखांचे अमली पदार्थ जप्त

## गुन्हे शाखेच्या पोलिसांची कारवाई

। नालासोपारा । वसई-विरारमधील अमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांची पाळेमुळे खणण्यास पोलीस आयुक्त मधुकर पांडेय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी सुरुवात केली आहे. मार्च महिन्याच्या १५ दिवसांत तिसऱ्यांदा लाखो रुपये किमतीचे अमली पदार्थ पोलिसांनी जप्त केले आहेत. गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांनी दोन आरोपींना पकडून १० लाख रुपये किमतीचे एमडी आणि चरस हे अमली पदार्थ जप्त केले आहेत. आचोळे पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपींवर गुन्हा दाखल करून मुद्देमाल जप्त केला आहे.पोलीस उपआयुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलीस उपनिरीक्षक उमेश भागवत, शिवाजी खाडे, पोलीस हवालदार अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सागर बारावकर, सचिन घेरे, शंकर शिंदे, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, राकेश पवार, सुमित जाधव, प्रवीण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव, संतोष चव्हाण यांनी सापळा रचून नालासोपारा-वसई लिंक रोडवरील चंदन नाका या ठिकाणी दोघे संशयास्पदरीत्या फिरताना दिसले. दोघांची दोन पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता आरोपी तोसिफ युसूफ पटेल (३८) याच्या ताब्यात १० लाख रुपयांचे ५० ग्रॅम एमडी आणि मेहंदी मोहम्मद अली शिराजी (४२) यांच्याकडून ६४ हजारांचे ८ ग्रॅम चरस असा एकूण १० लाख ६४ हजार रुपये किमतीचे अमली पदार्थ मिळून आले. दोन्ही आरोपींविरोधात एनडीपीएस अंतर्गत आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

CS CamScanner
Scanned with CamScanner

दि.18/03/2023

पुढारी पान क्र.6

# बिल्डरला ईडीची बनावट नोटीस

## दिल्लीतून एकाला अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदरमधील बिल्डर आणि त्याच्या भागीदारांना घाबरवून ६ कोटी ५५ लाख रुपये उकळण्यासाठी अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) बनावट समन्स प्रकरणात सहभाग असल्याच्या आरोपावरून काशिमीरा पोलिसांनी नवी दिल्लीतून एका व्यक्तीला अटक केली आहे.

भाईंदर मधील सालासर बिल्डर आनंद अग्रवाल यांनी भाईंदर पोलीस ठाण्यात २२ जानेवारी २०२३ रोजी गौतम अग्रवाल, मितेश शाह आणि राजू शहा यांच्या विरोधात लेखी तक्रार दाखल केली होती. त्यामध्ये मितेश शहा नावाच्या व्यक्तीने त्याला अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) त्याच्या नावाने पाठवलेले मूळ समन्स दाखवले. ई. डी. चौकशीची खोटे समन्स बनवुन ते खरे आहे असे भासवुन ई.डी. चौकशीची सेटलमेंट करण्यासाठी ५ लाख रुपये मितेश शहा याने मागुन व गौतम अग्रवाल याचे आमच्या कडे त्याचे सोल सेलींगचे व्यवहाराचे पैसे बाकी नसताना ते गौतम अग्रवाल यास साडे सहा करोड रुपये परत करा असे सांगुन खंडणी मागीतली होती. ती नोटीस खोटी असल्याची खात्री करून आनंद अग्रवाल यांनी भाईदर पोलीस ठाण्यात जाऊन २२ जानेवारी २०२३ रोजी गौतम अग्रवाल, राजू शाह आणि मितेश शहा यांच्याविरुद्ध लेखी तक्रार दाखल केली. मात्र हे संपूर्ण प्रकरण काशिमीरा परिसरातील जमिनीशी संबंधित असल्याने पोलिसांनी पुढील तपासासाठी ते काशिमीरा पोलीस ठाण्यात वर्ग केले होते.त्यानंतर काशिमिरा पोलिसांनी तपास करून १० मार्च २०२३ रोजी त्या तिघांविरोधात काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. काशिमिरा पोलीसांनी या गुन्ह्याचा तपास करून दिल्लीमध्ये लेखापाल असलेल्या कृष्णकुमार कौशिक याला अटक केली आहे, कौशिक याने ईडीचे खोटे समन्स बनवून दिल्याचे उघडकीस आले आहे. त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने २१ मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावली असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिप कदम यांनी सांगितले आहे. पुढील तपास सुरू असून लवकरच त्या तीन आरोपीना ताब्यात घेण्यात येईल असे कदम यांनी सांगितले आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

लोकमत



नव्याने सुरू झालेल्या नायगाव पोलिस ठाण्याचे उद्घाटन शुक्रवारी पोलिस महासंचालक रजनीश शेठ यांच्या हस्ते करण्यात आले.

# पोलिस सामान्यांच्या मदतीसाठी- रजनीश शेठ

## नायगाव पोलिस ठाण्याचे झाले उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** सामान्य नागरिकांच्या मदतीसाठी पोलिस असून नागरिकांचा विश्वास जिंकणे फार महत्त्वाचे काम आहे, असे प्रतिपादन पोलिस महासंचालक रजनीश शेठ यांनी केले. नायगांव पोलिस ठाण्याचे उद्घाटन रजनीश शेठ यांच्या हस्ते शुक्रवारी सकाळी झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार राजेंद्र गावित, पोलिस आयुक्त मधुकर पांडेय, अप्पर पोलिस आयुक्त श्रीकांत पाठक, पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे, सुहास बावचे, प्रकाश गायकवाड, पौर्णिमा चौगुले, सहायक पोलिस आयुक्त चंद्रकांत जाधव, रामचंद्र देशमुख आणि वसई आणि विरार परिमंडळातील पोलिस ठाण्यांचे प्रभारी, अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन नायगाव पोलिस ठाणे कार्यान्वित झाल्याने या भागामध्ये गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण येऊन गुन्हेगारीस आळा बसणार आहे. तसेच परिसरातील नागरिकांना पारपत्र आणि चारित्र्य पडताळणी यासारख्या अत्यावश्यक सेवांचा लाभ तत्परतेने घेता येईल. पोलिस आयुक्तालयात २० पोलिस ठाण्यांची मंजुरी असून १६ कार्यरत असून सतरावे पोलिस ठाणे शुक्रवारपासून सुरू करण्यात आले आहे. वालीव पोलिस ठाण्यात वर्षाला ८०० ते १ हजार गुन्हे दाखल व्हायचे. येथील पोलिसांचा ताण कमी करण्यासाठी नायगाव पोलिस ठाण्याची निर्मिती केल्याचे पोलीस आयुक्त मधुकर पांडेय यांनी सांगितले.

वसई परिसरात आदिवासी, सरकारी, वनविभाग यांच्या जमिनीवर भूमाफियांकडून होणारे अतिक्रमण यामुळे जमिनींच्या तक्रारी जास्त येतात. त्यामुळे पोलिसांनी या बाबीकडेही लक्ष घालावे. महसूल, मनपा प्रशासनाने याकडे प्रतिबंधक कारवाई केली पाहिजे; पण दुर्दैवाने ते कमी पडत असल्याचा घणाघात खासदार राजेंद्र गावित यांनी केला आहे.

पोलिसांनी ७५ ते ८० टक्के गुन्ह्यांची उकल करून गुन्हेगारींवर अंकुश ठेवल्याने तत्कालीन पोलिस आयुक्त सदानंद दाते आणि पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांचे गावित यांनी अभिनंदन केले.

### प्रस्तावित पोलिस ठाण्यांची होणार पूर्तता

- **कोणत्याही तक्रारी आल्यावर नि:पक्षपातीपणे चौकशी करून गुन्हा दाखल केलाच पाहिजे, असे महासंचालक रजनीश शेठ यांनी सांगितले.**
- या पोलिस आयुक्तालयाला आवश्यक मनुष्यबळ पुरविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. आता खारीगांव, काशीगांव आणि बोळींज ही तीन पोलिस ठाणे प्रस्तावित असून त्याचीही लवकर पूर्तता करणार आहोत.
- **पोलिस आयुक्तालय, मुख्यालय, परेड ग्राउंडसाठी दोन ठिकाणी जागा मंजूर झालेल्या आहेत. लवकरच तेथे बांधकाम सुरू होईल, असेही त्यांनी सांगितले.**

Hello Vasai
Page No. 6 Mar 18, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# दोन महिलांची वेश्या व्यवसायातून सुटका

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसई रेंज नाका येथे बुधवारी दुपारी बाराच्या सुमारास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलिसांना एक पुरुष दलाल फोनद्वारे संपर्क करून पुरुष गिऱ्हाईकांना बोलावून वेश्यागमनासाठी महिला पुरवत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कारवाई करत ३० व ३७ वर्षीय दोन पीडित महिलांची वेश्या व्यवसायातून सुटका केली आहे. आरोपी पुरुष दलालाविरोधात गुरुवारी वालीव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

## नायगांव पुलिस स्टेशन का उद्घाटन : इन क्षेत्रों को किया शामिल, मोबाइल नं. ई-मेल आईडी जारी

# महाराष्ट्र डीजीपी रजनीश सेठ के हाथों हुआ उद्घाटन





**अजहर शेख : संवाददाता**

**वसई :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के अंतर्गत 17 मार्च को नायगांव पुलिस स्टेशन का उद्घाटन राज्य के पुलिस महानिदेशक रजनीश सेठ के हाथों किया गया। इस अवसर पर तमाम पुलिस अधिकारी व नेता आदि गणमान्य उपस्थित थे।ज्ञात हो कि वालीव थाना क्षेत्र में बढ़ती आबादी और बढ़ते अपराध दर को देखते हुए नया थाना बनाना जरूरी हो गया।मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय में वर्तमान में 16 पुलिस स्टेशन कार्यरत हैं और नए नायगांव पुलिस स्टेशन के निर्माण के बाद अब 17 पुलिस स्टेशन कार्य कर रहे हैं। वालीव थाने की सीमाओं को विभाजित कर नया नायगांव थाना बनाया गया है, नया नायगांव थाना चालू होने से उक्त क्षेत्र में आपराधिक गतिविधियों पर नियंत्रण कर अपराध पर लगाम लगेगी तथा क्षेत्र के नागरिक पासपोर्ट सत्यापन, चरित्र सत्यापन जैसी आवश्यक सेवाओं का शीघ्र लाभ उठा सकेंगे और लोगों में सुरक्षा की भावना बढ़ेगी। नायगांव थाना अंतर्गत, पूर्व में,नागले गाँव से आगे ठाणे ग्रामीण पुलिस थाने की सीमा तक, कामन, मोरी, पोमन, शिलोत्तरा, देवदल, चिंचोटी, शारजागोरी, कोल्ही, पालनपाड़ा, आशानगर, खुटाडीपाड़ा, मोरी गाँव डोंगर कामन चिंचोटी गाँव अभ्यारण्य क्षेत्र। पश्चिम में, नायगाँव रेलवे स्टेशन से पूर्व की ओर परेरानगर, स्टारसिटी, डॉन बॉस्को, जुचंद्रा क्षेत्र दक्षिणः वर्सोवा से नायगाँव खाड़ी के उत्तर की ओर, मालजीपाड़ा, ससूनवघर, ससुपाड़ा, वर्सोवा जिला, काशीमीरा पुलिस स्टेशन सीमा तक। उत्तर में,टिवरी गांव की सीमा, नवकार सिटी फेज-3, मुंबई-अहमदाबाद राजमार्ग के दोनों ओर चिंचोटी नाका पुल के अंत तक, बापाने गांव की सीमा, कोल्ही गांव की सीमा, सातीवली गांव की सीमा। नायगांव थाने के वरिष्ठ पुलिस निरीक्षक रमेश भागे काम देखेंगे और उनका संपर्क नंबर 8652174999, 0250 - 2991156 व मेल आईडी pi.naigaon.mb-vv@mahapolice.gov.in है। 14 पुलिस अधिकारी, 43 पुलिस कर्मचारी और 28 म.सु.ब.कर्मचारियों जैसे मैनपावर उपलब्ध कराए गए हैं।वही पुलिस महानिदेशक ने उपस्थित नागरिकों, पुलिस अधिकारियों और कर्मचारियों से बातचीत की व विश्वास व्यक्त किया कि एक नया पुलिस स्टेशन बनने से नागरिकों की सुरक्षा बढ़ेगी और पुलिस को जनता की सुरक्षा के लिए अपने कर्तव्य का पालन करने के लिए हमेशा तैयार रहने के लिए निर्देशित किया और आपराधिक व्यवहार को रोकें।नायगांव थाना के उद्घाटन के अवसर पर सांसद राजेंद्र गावित, पुलिस कमिश्नर मधुकर पांडेय, डीसीपी अविनाश अंबुरे, प्रकाश गायकवाड़, सुहास बावचे व पोर्णिमा चौगुले आदि नागरिक व पुलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित थे।

Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-272 मुंबई, शनिवार 18 मार्च 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# दो महिलाओं को कराया मुक्त

**वसई :** एमबीबीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत अनैतीक मानवी वाहतुक शाखा, नालासोपारा यूनिट की टीम ने वसई पूर्व क्षेत्र के एक स्थान पर छापेमारी कर एक आरोपी को गिरफ्तार किया व 2 महिलाओं को छुड़ाने में सफलता पाई है। यह कार्रवाई डीसीपी (क्राइम ) अविनाश अंबुरे, एसीपी (क्राइम) अमोल मांडवे के मार्गदर्शन में अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिट पुलिस निरीक्षक संतोष चौधरी की टीम ने की है। पुलिस ने बताया कि वालीव पुलिस स्टेशन अंतर्गत रेंज नाका, वसई पूर्व स्थित वेश्यावृत्ति के लिए महिला दी जाती है, ऐसी गोपनीय सूचना अनैतीक मानवी वाहतुक शाखा, नालासोपारा यूनिट के पुलिस निरीक्षक संतोष चौधरी को मिली, जिसके बाद 15 मार्च को उक्त स्थान पर अनैतीक मानवी वाहतुक शाखा की टीम ने कार्रवाई कर 1 आरोपी को गिरफ्तार किया व 02 पीड़ित महिलाओं को मुक्त कराने में सफलता प्राप्त की है। पुलिस अधिकारी ने कहा कि आरोपी किसन उर्फ टायगर ब्रिजेश गौड़ (27) को गिरफ्तार कर लिया गया है और दो महिला पीड़ितों (उम्र 30 व 37 वर्ष ) को वेश्यावृत्ति से मुक्त कर दिया गया है।

Scanned with CamScanner

लोकमत

# तंबाखूजन्य पदार्थ जप्त

नालासोपारा : नालासोपारा येथे तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे. प्रगतीनगर नाका येथील घरघंटी पान टपरी, सार्वजनिक रोडजवळ आरोपी संदीप लवकुश मिश्रा (२६) याच्या ताब्यात पोलिसांना वेगवेगळ्या कंपनीचा सुगंधित पानमसाला, असा ४ हजार १४० रुपये किमतीचा तंबाखूजन्य पदार्थांचा साठा आढळून आला होता. हा साठा आरोपीने विक्रीकरिता ठेवलेला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. गुरुवारी तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 4 Mar 18, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# नागरिकांच्या तक्रारींची तत्काळ दखल घ्या

## पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांचे आदेश

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** पोलिसांची बांधिलकी ही सर्वसामान्य नागरिकांशी असायला हवी. पोलीस ठाण्यात आलेल्या नागरिकांच्या तक्रारींचे वर्गीकरण करण्यात वेळ न दडवता तत्काळ गुन्हे दाखल करावेत, असे आदेश राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी दिले.

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाल्यानंतर नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्यात येत आहे. वालीव पोलीस ठाण्याचे विभाजन करून नायगाव हे नवीन पोलीस ठाणे तयार करण्यात आले आहे. त्याचे उद्घटन शुक्रवारी सकाळी सेठ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

या वेळी खासदार राजेंद्र गावित, पोलीस आयुक्त मधुकर पांडे, अतिरिक्त पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक आदी उपस्थित होते.

नागरिकांच्या मनात पोलिसांबद्दल विश्वास वाटायला हवा. त्यासाठी नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून काम करायला हवे. पोलीस ठाण्यात आलेल्या तक्रारी कुठल्या प्रकारच्या आहेत, त्याचे वर्गीकरण करण्यात वेळ वाया न घालवता तत्काळ गुन्हे दाखल करून नागरिकांना न्याय द्यावा, असे आदेश त्यांनी पोलिसांना दिले. तर, या पोलीस ठाण्यामुळे गुन्हेगारीला आळा बसण्यास मदत होईल, असा विश्वास खासदार गावित यांनी व्यक्त केला.

**नायगाव पोलीस ठाण्यात १३ अधिकारी**

नायगाव पूर्वेच्या तिवरी रोड येथील वामन दाव्याजवळील खासगी इमारतीमधील आठ गाळे भाड्याने घेऊन हे पोलीस ठाणे सुरू करण्यात आले आहे. या पोलीस ठाण्याची रचना कॉर्पोरेट कार्यालयाच्या धर्तीवर करण्यात आली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे यांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भामे यांच्या सोबत दोन पोलीस निरीक्षक, पाच साहाय्यक पोलीस निरीक्षक, असे मिळून १३ पोलीस अधिकारी आणि ४३ पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय महाराष्ट्र सुरक्षा बलाचे २७ कर्मचारी या पोलीस ठाण्यात तैनात करण्यात आले आहेत. हे पोलीस ठाणे भाड्याच्या इमारतीत असल्याने या पोलीस ठाण्यात पोलीस कोठडी नाही. दरम्यान, उद्घाटन सोहळा संपताच एक दाम्पत्य तक्रार दाखल करण्यासाठी आले होते.



### 'उर्वरित तीन पोलीस ठाणी लवकरच'

पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाल्यानंतर शहरात सात नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती केली जाणार होती. त्यामध्ये वसई-विरार शहरातील आचोळे, पेल्हार, मांडवी, बोळिंज, नायगाव या पाच पोलीस ठाण्यांची, तर मीरा-भाईंदर शहरात काशिगाव आणि खारीगाव या दोन पोलीस ठाण्यांचा समावेश होता. त्यापैकी आचोळे, पेल्हार, मांडवी आणि नायगाव ही चार पोलीस ठाणी तयार झाली आहेत. तर, उर्वरित बोळिंज, काशिगाव आणि खारीगाव ही तीन पोलीस ठाणी लवकरात लवकर सुरू करणार आहोत, असे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी सांगितले.


Scanned with CamScanner

1 अप्रैल को रिहा हो सकते हैं सिद्धू ▸p12
NBT नवभारत टाइम्स
फ्रांस में पेंशन सुधार बिल पर छिड़े प्रदर्शन ▸p12

# सात साल पुराने मामले में वांछित हत्यारोपी गिरफ्तार

■ निसं, मीरा-भाईंदरः क्राइम ब्रांच यूनिट-1 ने सात साल पुराने हत्या के एक मामले में वांछित आरोपी अहमद सिद्की (41 वर्ष) को उत्तरप्रदेश से गिरफ्तार किया है। इस मामले में तीन अन्य आरोपियों को पुलिस पहले ही गिरफ्तार कर चुकी है। एक आरोपी को उम्रकैद की सजा सुनाई गई है। क्राइम ब्रांच के पीआई अविराज कुराडे के नेतृत्व में पुलिस ने इस वांछित आरोपी को पकड़ा है। यह मामला जुलाई 2016 का है। नया नगर पुलिस में चारों लोगों ने मिलकर रईस रोशन अनवर हुसैन की हत्या कर दी थी। आपसी रंजिश के चलते हुसैन का मर्डर हुआ था। इस मामले को सुलझाने में क्राइम ब्रांच के पुलिस अधिकारी कैलाश टोकले, संजय पाटिल, प्रशांत विसपुते और पुष्पेंद्र थापा का योगदान रहा।

## 3 आरोपी पहले ही हो चुके हैं गिरफ्तार | एक आरोपी को उम्रकैद की सजा



हत्या के वांछित आरोपी को क्राइम ब्रांच के अधिकारियों ने उत्तर प्रदेश से गिरफ्तार किया।

• अमित तिवारी

Scanned with CamScanner


1 अप्रैल को रिहा हो सकते हैं सिद्धू! ▸p12

NBT नवभारत टाइम्स


फ्रांस में पेंशन सुधार बिल पर छिड़े प्रदर्शन ▸p12


# सात साल पुराने मामले में वांछित हत्यारोपी गिरफ्तार

**3 आरोपी पहले ही हो चुके हैं गिरफ्तार | एक आरोपी को उम्रकैद की सजा**

■ **निसं, मीरा-भाईंदर:** क्राइम ब्रांच यूनिट-1 ने सात साल पुराने हत्या के एक मामले में वांछित आरोपी अहमद सिद्दकी (41 वर्ष) को उत्तरप्रदेश से गिरफ्तार किया है। इस मामले में तीन अन्य आरोपियों को पुलिस पहले ही गिरफ्तार कर चुकी है। एक आरोपी को उम्रकैद की सजा सुनाई गई है। क्राइम ब्रांच के पीआई अविराज कुराडे के नेतृत्व में पुलिस ने इस वांछित आरोपी को पकड़ा है। यह मामला जुलाई 2016 का है। नया नगर पुलिस में चारों लोगों ने मिलकर रईस रोशन अनवर हुसैन की हत्या कर दी थी। आपसी रंजिश के चलते हुसैन का मर्डर हुआ था। इस मामले को सुलझाने में क्राइम ब्रांच के पुलिस अधिकारी कैलाश टोकले, संजय पाटिल, प्रशांत विसपुते और पुष्पेंद्र थापा का योगदान रहा।



हत्या के वांछित आरोपी को क्राइम ब्रांच के अधिकारियों ने उत्तर प्रदेश से गिरफ्तार किया।

• अमित तिवारी

Scanned with CamScanner

# नागरिकांच्या तक्रारींची तत्काळ दखल घ्या

## पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांचे आदेश

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** पोलिसांची बांधिलकी ही सर्वसामान्य नागरिकांशी असायला हवी. पोलीस ठाण्यात आलेल्या नागरिकांच्या तक्रारींचे वर्गीकरण करण्यात वेळ न दडवता तत्काळ गुन्हे दाखल करावेत, असे आदेश राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी दिले.

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाल्यानंतर नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्यात येत आहे. वालीव पोलीस ठाण्याचे विभाजन करून नायगाव हे नवीन पोलीस ठाणे तयार करण्यात आले आहे. त्याचे उद्घटन शुक्रवारी सकाळी सेठ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

या वेळी खासदार राजेंद्र गावित, पोलीस आयुक्त मधुकर पांडे, अतिरिक्त पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक आदी उपस्थित होते.

नागरिकांच्या मनात पोलिसांबद्दल विश्वास वाटायला हवा. त्यासाठी नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून काम करायला हवे. पोलीस ठाण्यात आलेल्या तक्रारी कुठल्या प्रकारच्या आहेत, त्याचे वर्गीकरण करण्यात वेळ वाया न घालवता तत्काळ गुन्हे दाखल करून नागरिकांना न्याय द्यावा, असे आदेश त्यांनी पोलिसांना दिले. तर, या पोलीस ठाण्यामुळे गुन्हेगारीला आळा बसण्यास मदत होईल, असा विश्वास खासदार गावित यांनी व्यक्त केला.

### नायगाव पोलीस ठाण्यात १३ अधिकारी

नायगाव पूर्वेच्या तिवरी रोड येथील वामन ढाब्याजवळील खासगी इमारतीमधील आठ गाळे भाड्याने घेऊन हे पोलीस ठाणे सुरू करण्यात आले आहे. या पोलीस ठाण्याची रचना कॉर्पोरेट कार्यालयाच्या धर्तीवर करण्यात आली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे यांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भामे यांच्या सोबत दोन पोलीस निरीक्षक, पाच साहाय्यक पोलीस निरीक्षक, असे मिळून १३ पोलीस अधिकारी आणि ४३ पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय महाराष्ट्र सुरक्षा बलाचे २७ कर्मचारी या पोलीस ठाण्यात तैनात करण्यात आले आहेत. हे पोलीस ठाणे भाड्याच्या इमारतीत असल्याने या पोलीस ठाण्यात पोलीस कोठडी नाही. दरम्यान, उद्घाटन सोहळा संपताच एक दाम्पत्य तक्रार दाखल करण्यासाठी आले होते.



### 'उर्वरित तीन पोलीस ठाणी लवकरच'

पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाल्यानंतर शहरात सात नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती केली जाणार होती. त्यामध्ये वसई-विरार शहरातील आचोळे, पेल्हार, मांडवी, बोळिंज, नायगाव या पाच पोलीस ठाण्यांची, तर मीरा-भाईंदर शहरात काशिगाव आणि खारीगाव या दोन पोलीस ठाण्यांचा समावेश होता. त्यापैकी आचोळे, पेल्हार, मांडवी आणि नायगाव ही चार पोलीस ठाणी तयार झाली आहेत. तर, उर्वरित बोळिंज, काशिगाव आणि खारीगाव ही तीन पोलीस ठाणी लवकरात लवकर सुरू करणार आहोत, असे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी सांगितले.



Scanned with CamScanner

1997 से

KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्ष: 26 अंक-272 मुंबई, शनिवार 18 मार्च 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# दो महिलाओं को कराया मुक्त

**वसई :** एमबीबीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत अनैतीक मानवी वाहतुक शाखा, नालासोपारा यूनिट की टीम ने वसई पूर्व क्षेत्र के एक स्थान पर छापेमारी कर एक आरोपी को गिरफ्तार किया व 2 महिलाओं को छुड़ाने में सफलता पाई है। यह कार्रवाई डीसीपी (क्राइम ) अविनाश अंबुरे, एसीपी (क्राइम) अमोल मांडवे के मार्गदर्शन में अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिट पुलिस निरीक्षक संतोष चौधरी की टीम ने की है। पुलिस ने बताया कि वालीव पुलिस स्टेशन अंतर्गत रेंज नाका, वसई पूर्व स्थित वेश्यावृत्ति के लिए महिला दी जाती है, ऐसी गोपनीय सूचना अनैतीक मानवी वाहतुक शाखा, नालासोपारा यूनिट के पुलिस निरीक्षक संतोष चौधरी को मिली, जिसके बाद 15 मार्च को उक्त स्थान पर अनैतीक मानवी वाहतुक शाखा की टीम ने कार्रवाई कर 1 आरोपी को गिरफ्तार किया व 02 पीड़ित महिलाओं को मुक्त कराने में सफलता प्राप्त की है। पुलिस अधिकारी ने कहा कि आरोपी किसन उर्फ टायगर ब्रिजेश गौड़ (27) को गिरफ्तार कर लिया गया है और दो महिला पीड़ितों (उम्र 30 व 37 वर्ष ) को वेश्यावृत्ति से मुक्त कर दिया गया है।

Scanned with CamScanner

## नायगांव पुलिस स्टेशन का उद्घाटन : इन क्षेत्रों को किया शामिल, मोबाइल नं. ई-मेल आईडी जारी

# महाराष्ट्र डीजीपी रजनीश सेठ के हाथों हुआ उद्घाटन





**अजहर शेख : संवाददाता**

**वसई :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के अंतर्गत 17 मार्च को नायगांव पुलिस स्टेशन का उद्घाटन राज्य के पुलिस महानिदेशक रजनीश सेठ के हाथों किया गया। इस अवसर पर तमाम पुलिस अधिकारी व नेता आदि गणमान्य उपस्थित थे।ज्ञात हो कि वालीव थाना क्षेत्र में बढ़ती आबादी और बढ़ते अपराध दर को देखते हुए नया थाना बनाना जरूरी हो गया।मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय में वर्तमान में 16 पुलिस स्टेशन कार्यरत हैं और नए नायगांव पुलिस स्टेशन के निर्माण के बाद अब 17 पुलिस स्टेशन कार्य कर रहे हैं। वालीव थाने की सीमाओं को विभाजित कर नया नायगांव थाना बनाया गया है, नया नायगांव थाना चालू होने से उक्त क्षेत्र में आपराधिक गतिविधियों पर नियंत्रण कर अपराध पर लगाम लगेगी तथा क्षेत्र के नागरिक पासपोर्ट सत्यापन, चरित्र सत्यापन जैसी आवश्यक सेवाओं का शीघ्र लाभ उठा सकेंगे और लोगों में सुरक्षा की भावना बढ़ेगी। नायगांव थाना अंतर्गत, पूर्व में,नागले गाँव से आगे ठाणे ग्रामीण पुलिस थाने की सीमा तक, कामन, मोरी, पोमन, शिलोत्तरा, देवदल, चिंचोटी, शारजागोरी, कोल्ही, पालनपाड़ा, आशानगर, खुटाडीपाड़ा, मोरी गाँव डोंगर कामन चिंचोटी गाँव अभ्यारण्य क्षेत्र। पश्चिम में, नायगाँव रेलवे स्टेशन से पूर्व की ओर परेरानगर, स्टारसिटी, डॉन बॉस्को, जुचंद्रा क्षेत्र दक्षिणः वर्सोवा से नायगाँव खाड़ी के उत्तर की ओर, मालजीपाड़ा, ससूनवघर, ससुपाड़ा, वर्सोवा जिला, काशीमीरा पुलिस स्टेशन सीमा तक। उत्तर में,टिवरी गांव की सीमा, नवकार सिटी फेज-3, मुंबई-अहमदाबाद राजमार्ग के दोनों ओर चिंचोटी नाका पुल के अंत तक, बापाने गांव की सीमा, कोल्ही गांव की सीमा, सातीवली गांव की सीमा। नायगांव थाने के वरिष्ठ पुलिस निरीक्षक रमेश भागे काम देखेंगे और उनका संपर्क नंबर 8652174999, 0250 - 2991156 व मेल आईडी pi.naigaon.mb-vv@mahapolice.gov.in है। 14 पुलिस अधिकारी, 43 पुलिस कर्मचारी और 28 म.सु.ब.कर्मचारियों जैसे मैनपावर उपलब्ध कराए गए हैं।वही पुलिस महानिदेशक ने उपस्थित नागरिकों, पुलिस अधिकारियों और कर्मचारियों से बातचीत की व विश्वास व्यक्त किया कि एक नया पुलिस स्टेशन बनने से नागरिकों की सुरक्षा बढ़ेगी और पुलिस को जनता की सुरक्षा के लिए अपने कर्तव्य का पालन करने के लिए हमेशा तैयार रहने के लिए निर्देशित किया और आपराधिक व्यवहार को रोकें।नायगांव थाना के उद्घाटन के अवसर पर सांसद राजेंद्र गावित, पुलिस कमिश्नर मधुकर पांडेय, डीसीपी अविनाश अंबुरे, प्रकाश गायकवाड़, सुहास बावचे व पोर्णिमा चौगुले आदि नागरिक व पुलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित थे।

Scanned with CamScanner

लोकमत



नव्याने सुरू झालेल्या नायगाव पोलिस ठाण्याचे उद्घाटन शुक्रवारी पोलिस महासंचालक रजनीश शेठ यांच्या हस्ते करण्यात आले.

# पोलिस सामान्यांच्या मदतीसाठी- रजनीश शेठ

## नायगाव पोलिस ठाण्याचे झाले उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** सामान्य नागरिकांच्या मदतीसाठी पोलिस असून नागरिकांचा विश्वास जिंकणे फार महत्त्वाचे काम आहे, असे प्रतिपादन पोलिस महासंचालक रजनीश शेठ यांनी केले. नायगांव पोलिस ठाण्याचे उद्घाटन रजनीश शेठ यांच्या हस्ते शुक्रवारी सकाळी झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार राजेंद्र गावित, पोलिस आयुक्त मधुकर पांडेय, अप्पर पोलिस आयुक्त श्रीकांत पाठक, पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे, सुहास बावचे, प्रकाश गायकवाड, पौर्णिमा चौगुले, सहायक पोलिस आयुक्त चंद्रकांत जाधव, रामचंद्र देशमुख आणि वसई आणि विरार परिमंडळातील पोलिस ठाण्यांचे प्रभारी, अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन नायगाव पोलिस ठाणे कार्यान्वित झाल्याने या भागामध्ये गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण येऊन गुन्हेगारीस आळा बसणार आहे. तसेच परिसरातील नागरिकांना पारपत्र आणि चारित्र्य पडताळणी यासारख्या अत्यावश्यक सेवांचा लाभ तत्परतेने घेता येईल. पोलिस आयुक्तालयात २० पोलिस ठाण्यांची मंजुरी असून १६ कार्यरत असून सतरावे पोलिस ठाणे शुक्रवारपासून सुरू करण्यात आले आहे. वालीव पोलिस ठाण्यात वर्षाला ८०० ते १ हजार गुन्हे दाखल व्हायचे. येथील पोलिसांचा ताण कमी करण्यासाठी नायगाव पोलिस ठाण्याची निर्मिती केल्याचे पोलीस आयुक्त मधुकर पांडेय यांनी सांगितले.

वसई परिसरात आदिवासी, सरकारी, वनविभाग यांच्या जमिनीवर भूमाफियांकडून होणारे अतिक्रमण यामुळे जमिनींच्या तक्रारी जास्त येतात. त्यामुळे पोलिसांनी या बाबीकडेही लक्ष घालावे. महसूल, मनपा प्रशासनाने याकडे प्रतिबंधक कारवाई केली पाहिजे; पण दुर्दैवाने ते कमी पडत असल्याचा घणाघात खासदार राजेंद्र गावित यांनी केला आहे.

पोलिसांनी ७५ ते ८० टक्के गुन्ह्यांची उकल करून गुन्हेगारींवर अंकुश ठेवल्याने तत्कालीन पोलिस आयुक्त सदानंद दाते आणि पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांचे गावित यांनी अभिनंदन केले.

### प्रस्तावित पोलिस ठाण्यांची होणार पूर्तता

- **कोणत्याही तक्रारी आल्यावर नि:पक्षपातीपणे चौकशी करून गुन्हा दाखल केलाच पाहिजे, असे महासंचालक रजनीश शेठ यांनी सांगितले.**
- या पोलिस आयुक्तालयाला आवश्यक मनुष्यबळ पुरविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. आता खारीगांव, काशीगांव आणि बोळींज ही तीन पोलिस ठाणे प्रस्तावित असून त्याचीही लवकर पूर्तता करणार आहोत.
- **पोलिस आयुक्तालय, मुख्यालय, परेड ग्राउंडसाठी दोन ठिकाणी जागा मंजूर झालेल्या आहेत. लवकरच तेथे बांधकाम सुरू होईल, असेही त्यांनी सांगितले.**



Scanned with CamScanner